# विद्यार्थी म्हणणार ‘आय लव्ह यू बुक्स’




**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

## विद्यापीठात ‘व्हॅलेंटाइन डे’निमित्त उद्या व्यक्त होणार पुस्तकप्रेम

**कोल्हापूर :** १४ फेब्रुवारी या ‘व्हॅलेंटाइन डे’निमित्त शिवाजी विद्यापीठातील कट्ट्यावरही ती प्रेमाची अडीच अक्षरांची भाषा फुलणार आहे. इथेही विद्यापीठातील विद्यार्थी मनातील प्रेम ओठावर आणणार आहेत. पण हे प्रेम असेल आवडलेल्या पुस्तकाविषयीचे. ‘व्हॅलेंटाइन डे’च्या औचित्याने शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी ‘आय लव्ह यू बुक्स’ असे म्हणत पुस्तकांवरचे प्रेम व्यक्त करणार आहेत. ‘व्हॅलेंटाइन डे’ची ही अनोखी अभिव्यक्ती १२ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता विद्यापीठात शब्दांकित होणार आहे.



सध्या तरुणाईत ‘व्हॅलेंटाइन डे’ची उत्सुकता आहे. ७ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या व्हॅलेंटाइन वीकची फीव्हर चांगलाच रंगात आला आहे. रोझ डे ते व्हॅलेंटाइन डेपर्यंतचा हा प्रेमाचा रंग १४ फेब्रुवारीला अनेकार्थांनी गहिरा होणार आहे. प्रेम या गुलाबी भावनेभोवती फिरणाऱ्या तरुणाईच्या जगात काही हटके आणि लक्ष वेधून घेणारेही उपक्रम सुरू आहेत. त्यापैकीच एक असा ‘आम्ही पुस्तकावर प्रेम करतो’ हा मंच बहरणार आहे.

शिवाजी विद्यापीठ आणि वाचनकट्टा यांच्यावतीने प्रेमाची भाषा आणि भावलेल्या पुस्तकांची पाने असा संवादाचा धागा गुंफण्यात येणार आहे. प्रेमाची निशाणी असलेल्या लाल बदामाचा टॅग काळजात घुसलेल्या पुस्तकासाठी लागू शकतो असे म्हणत पुस्तकवेडी तरुणाई या मंचावर एकत्र येणार आहे. शीतल पाटील, सचिन कदम आणि ऋतुजा माने यांच्या अभिवाचनानंतर या पुस्तकांविषयी संवाद होणार आहे.

व्हिक्टर फ्रॅन्कल लिखित आणि डॉ. विजया बापट अनुवादित ‘अर्थाच्या शोधात’, एपीजे अब्दुल कलाम लिखित ‘अग्निपंख’ आणि किरण बेदी लिखित ‘आय डेअर’ या पुस्तकांनी तरुणाईला झपाटून टाकले आहे. ही पुस्तके वाचनाच्या जगात हरवून जाणाऱ्या अनेक तरुण डोळ्यांच्या प्रदेशात सामावली आहेत. वाचून पान पलटून जाण्यापलीकडे त्या पानातील अनुभवांचे ठसे या पुस्तकांनी काही तरुण वाचकांच्या मनावर उमटवले आहेत. एक व्यक्ती कशी कर्तृत्वाने मोठी होते आणि हजारोंसाठी आदर्शाचे वलय निर्माण करते हे दाखविणारी ही पुस्तके खरोखरच वाचकांसाठी श्वास बनली आहेत. प्रेमात जेव्हा समरस होण्याच्या, तुझ्यासाठी कायपण असे म्हणण्याच्या शपथा घेतल्या जातात, तितकाच गहिरेपणा या पुस्तकांनी अनेकांच्या आयुष्याला दिला आहे. ध्येयासाठी काहीही करणाऱ्या माणसांच्या अनुभवाचे विश्व अनुभवण्याचा खोलपणा देणाऱ्या या पुस्तकांबाबतच्या वेड्या प्रेमाची कबुली देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील ही तरुणाई खऱ्या अर्थाने वेगळा ‘व्हॅलेंटाइन डे’ साजरा करणार आहे.

